भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. १७७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०६/०४/२०१८

**१) लाच रक्कम स्विकारतांन मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०५/०२/२०१८ चे १७.४५ वाजता. दरम्यान यातील आरोपी क्र. १ गणवीर याने तक्रारदार संतोष सुर्यवंशी यांना पडताळणी कार्यवाही वेळी यांनी सन २०११ रोजी रोजगार सेवक पदाचा राजीनामा दिल्याने त्याचे सन २०१७ चे माहे मे ते नोव्हेबर महीण्याचे मानधनाचे धनादेशावर स्वाक्षरी करून धनादेश काढुन देण्याकरीता १,६००/रु. लाचेची मागणी करून तळजोळी अंती १५,००/रु. प्रत्यक्ष सापळा कार्यवाही वेळी आपले कार्यालयातील परीचर मयाराम चौधरी यांचे हस्ते १,५००/रु. ची लाच रक्कम स्विकारल्याने सरतर्फे फिर्यादी पोनी. पारधी लाचलुचपत विभाग भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ७,१२,१३(१)(ड) ,१३(२) लाचचपत प्रतिबंधक कायदा भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. पारधी लाचलुचपत विभाग भंडारा पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) लॅपटॉप व नगदी पैश्याची चोरी:–**

दिनाक ०४/०४/२०१८ चे ०८०० ते २१.०० दरम्यान यातील अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे खोलीचे मागील दार तोडुन आत प्रवेश करून खोलीत ठेवलेला लेनोव्हा कंपनीचा लॅपटॉप कि. १२,०००/रु. व नगदी ३,०००/रु. च एक नोटबुक असा एकुन १५,०००/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी शिवरतन विश्वमित्र शहा वय २१ वर्ष रा. रूंगाटोला जि. गोदींया पो.स्टे सालेकसा ह. मु. मॅनिकल वसाहत गृह गोसे खुर्द यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ,४५४,४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. बिसने पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलची चोरी :–**

दिनाक ०५/०४/२०१८ चे १२.३० वाजता. दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात आरोपीने कुणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादीचे घरासमोर रोडवर ठेवलेली नवीन होंडा सी.बी. युनिकॉर्न क्र. मोटार सायकल नंबर नसलेली तिचा चेसीस न. क्र. एमई ४ केसी. २०७ बीजे ८०१२४२८ दंजीन नं. केसी.२०ई ८१०४९८६१ कि. ८८,८२७/रु. ची चोरून नेल्याने फिर्यादी अक्षय अरविंदराव भगत वय २३ वर्ष रा. महाराष्ट्र कॉलोनी जवळ लक्ष्मीनगर मोर्शी जि. अमरावती ह.मु. पवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना कळपते पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**४) मोटार सायकलची चोरी:–**

दिनाक ०३/०४/२०१८ चे २३.३० ते २४.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादीने आपली हिरो होन्डा स्प्लेंडर प्लस मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम २२४६ कि. २०,००/रु. ची गोडावुन चौकी जवळ उभी ठेवुन गोडावुन चेक करण्यास गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने कुनीही नसल्याची संधी साधुन गोसे खुर्द येथुन चोरून नेल्याने, फिर्यादी महेश मुरलीधर भोगे वय ३६ वर्ष रा. गणेश वार्ड पवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. बिसने पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**५) काही कारण नसतांना भांडण करून डोक्यावर ग्लॉस मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनाक ०५/०४/२०१८ चे १८.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी हा युवराज बारई चे देशी दारू दुकानात दारू पिण्यास गेला असता यातील आरोपी याने फिर्यादीस काही कारण नसतांनी भांडण करून त्याच्या हातातील ग्लॉस फिर्यादीच्या डोक्यावर मारून जखमी केल्याने फिर्यादी जितेन्द्र मदन चव्हान वय ३३ वर्ष रा. मोहाडी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

६) ठोमणे मारून शिवीगाळ करून काठीने मारपीट केल्याने गुन्हा नोंद :–

दिंनाक ०२/०४/२०१८ चे ०५.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी हा स्वतःचे घरी स्वयंपाक करीत असतांना यातील आरोपी क्र. १ व ३ हे फिर्यादीस आमचे चना, गहु, उळीद व वटान्याचे ढिगाऱ्याला आग लावुन आमची ६०, ०००/रु. ची नुकसानी केल्याने असे ठोमणे मारून शिवीगाळ करून आरोपी क्र. १ हा फिर्यादीच्या घरी जावुन फिर्यादीस ओढत अंगणात आणुन काठीने व लाथाबुक्याने पाटीवर, पोटावर, छातीवर मारून मारपीट केली तसेच आरोपी क्र. ३ व ४ यानी शुध्दा थापड बुक्यांनी मारपीट केल्याने फिर्यादी केवळराम अनिराम बोरकर वय ५० वर्ष रा. बोरगाव यांचे बयाण व डॉ. एक्स–रे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४५२,३२५,५०४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

७) उपचारा दरम्यान इसम मरण पावल्याने गुन्हा नोंद :–

दिंनाक ११/०३/२०१८ चे १४.०० वाजता. दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल क्र. एम एच ४०/बीडी ३८७८ ने लाखनी येथे मित्राचे घरी लग्न लावुन एन.एन. ०६ रोडने गावी केसलापुर येथे मौदा मार्गे जात असतांनी चिखली फाटा येथे आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन याचे ताब्यातील वाहन स्लिप होवुन स्वतः गाडीसह खाली पडुन त्याचे डोक्याला गंभिर मार लागल्याने त्यास औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचरा दरम्यान मरण मरण पावल्याने पो.स्टे जवाहरनगर मर्ग क्र. ०४/१८ कलम १७४जाफौ. चे मर्ग चे तपासत निषपन्न झाल्याने चौकशी अहवालावरून सरतर्फे फिर्यादी सफौ. कांबळे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३०४(अ) भादवी. सहकलम १८४, मोवका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कांबळे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

८) विषारी औषधी प्राशन करून उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु:–

दिंनाक ०५/०४/२०१८ चे ०२.४० वाजता दरम्यान यातील मृतक गोपाल टोलीराम उईके वय ४० वर्ष रा. झारली याने किटक नाशन औषधी (थिमेंट) प्राशन केल्याने त्यास गंभिर अवस्थेत औषधोपचारा करीता सु. बो. दवाखाना तुमसर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरून सरतर्फे फिर्यादी पोहवा. सरोदो यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चुटे पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

९) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक ०५/०४/२०१८ चे ११.५० ते १२.२० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर वाहन हे सु.बो. दवाखाना तुमसर येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशी उभी करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनी. पुसाटे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. पुसाटे पो.स्टे. दिघोरी करीत आहेत.

१०) अवैध दारु अडड्यांवर धाडी . :–

दिनांक ०५/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा, साकोली, अडयाळ व दिघोरी येथे अवैध हातभट्टी व देशी दारू अडड्यावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०५ लिटर हातभंट्टी दारू किमती ५००/रु. व ०७ लिटर ५६० देशी/विदेशी+ ४७५०० नगदी दारु + लोखंडी कपाट किंमती ५९४८९/–रु. व जुगारातुन ६४९०/रु. असा एकुण ६६,४७९/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०५/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी – ०३ तीन सिटर वाहनाकरीता ०८ ईतर वाहनांवरती – ८३ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनी. माया चाटसे)
महिला सेल भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता